महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - 400 023.
email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbu@indiatimes.com
Tel.No:- Jt.Commr: 2660152, Dy.Commr: 2665569, FAX No. 2662370

वाचावे :- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर 1098/लेबल/5-ब, दिनांक 10 मार्च 1998

---


## परिपत्रक

क्रमांक : एफएलआर 1107/41464/5-ब                    मुंबई, दिनांक 39 मे 2007

1. महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अँड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर नियम 1966 मधील नियम 17 (26) अनुसार महाराष्ट्र राज्यात निर्मित होणा-या भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या बाटल्यावर लावण्यात येणाऱ्या लेबल्सचा वापर करण्यापूर्वी आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुबई यांच्याकडून मंजूर करणे आवश्यक असल्याचे तसेच परराज्यात/परदेशात विक्री करण्याआधी लेबल मंजूर करण्याबाबत सुचना उपरोक्त संदर्भित परिपत्रक दिनांक 10 मार्च 1998 अन्वये या कार्यालयांतून निर्गमीत करण्यांत आले आहे. परंतु परराज्यांत/परदेशांत निर्यात होणा-या विदेशी मद्याच्या लेबल मध्ये " Not for sale in Maharashtra" आणि ज्या राज्यांत निर्यात करावयाची आहे त्या राज्यांत विक्रीकरीता " For sale in (राज्याचे नाव) State only " किंवा परदेशात निर्यात होत असल्यास " For export overseas only " असे छापण्यात येते. परंतु सदर छपाई हे बारीक अक्षरांत करण्यात येत असल्यामूळे त्याचा दुरुपयोग झाल्यास महाराष्ट्र राज्यांत विक्री करीता असलेल्या विदेशी मद्य विक्रीवर याचा परिणाम होऊन शासनाचा महसुल बुडण्याची शक्यता

नाकारतां येत नाही. सदर बाब विचारांत घेतां परराज्यात/परदेशांत निर्यात होणा-या विदेशी मद्याच्या लेबलमध्ये खालीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे.

2. वरील परिच्छेद 1 मध्ये नमूद केलेली घोषवाक्ये छापण्यात यावीत तसेच लेबलच्या मागील बाजूस (Back side) खालील माहिती ठळक अक्षरांत कॉंट्रॅस्ट शाईने तिरप्या चौकटीमध्ये छापून अशी लेबले या कार्यालयास मंजूरीसाठी सादर करावीत.




3. यापुढे विदेशी मद्य निर्यातीसाठी उपरोक्त सुचनांचे पालन केल्यावरच विदेशी मद्य निर्यातीसाठी लेबल मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( रमानाथ झा )
आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति : 1) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
2) सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
3) सर्व पीएलएल अनुज्ञप्तीधारक महाराष्ट्र राज्य
4) सर्व प्रभारी अधीकारी पीएलएल अनुज्ञप्ती
5) सर्व राज पत्रित अधिकारी
6) या कार्यालयाचे शाखा क्रमांक 5-ब
7) अभिलेख शाखा (5 प्रती)

महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुनं जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - 400 023.
email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbu@indiatimes.com
Tel.No:- Jt.Commr: 2660152, Dy.Commr: 2665569, FAX No. 2662370

वाचावे :- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर 1098/लेवल/5-ब, दिनांक 10 मार्च 1998

---

परिपत्रक

क्रमांक : एफएलआर 1107/41464/5-ब                                        मुंबई, दिनांक 39 मे 2007

1. महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अँड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर नियम 1966 मधील नियम 17 (26) अनुसार महाराष्ट्र राज्यात निर्मित होणा-या भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या बाटल्यावर लावण्यात येणाऱ्या लेबल्सचा वापर करण्यापूर्वी आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून मंजूर करणे आवश्यक असल्याचे तसेच परराज्यात/परदेशात विक्री करण्याआधी लेबल मंजूर करण्याबाबत सुचना उपरोक्त संदर्भित परिपत्रक दिनांक 10 मार्च 1998 अन्वये या कार्यालयातून निर्गमीत करण्यांत आले आहे. परंतु परराज्यांत/परदेशांत निर्यात होणा-या विदेशी मद्याच्या लेबल मध्ये " Not for sale in Maharashtra" आणि ज्या राज्यांत निर्यात करावयाची आहे त्या राज्यांत विक्रीकरीता " For sale in (राज्याचे नाव) State only " किंवा परदेशात निर्यात होत असल्यास " For export overseas only " असे छापण्यात येते. परंतु सदर छपाई हे बारीक अक्षरांत करण्यात येत असल्यामूळे त्याचा दुरुपयोग झाल्यास महाराष्ट्र राज्यात विक्री करीता असलेल्या विदेशी मद्य विक्रीवर याचा परिणाम होऊन शासनाचा महसुल बुडण्याची शक्यता

नाकारतां येत नाही. सदर बाब विचारांत घेतां परराज्यांत/परदेशांत निर्यात होणा-या विदेशी मद्याच्या लेबलमध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यांत येत आहे.

2. वरील परिच्छेद 1 मध्ये नमूद केलेली घोषवाक्ये छापण्यात यावीत तसेच लेबलच्या मागील बाजूस (Back side) खालील माहिती ठळक अक्षरांत कॉंट्रॅस्ट शाईने तिरप्या चौकटीमध्ये छापून अशी लेबले या कार्यालयास मंजूरीसाठी सादर करावीत.

FOR EXPORT ONLY
NOT FOR SALE IN MAHARASHTRA

3. यापुढे विदेशी मद्य निर्यातीसाठी उपरोक्त सुचनांचे पालन केल्यावरच विदेशी मद्य निर्यातीसाठी लेबल मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( रमानाथ झा )
आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति : 1) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
2) सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
3) सर्व पीएलएल अनुज्ञप्तीधारक महाराष्ट्र राज्य
4) सर्व प्रभारी अधीकारी पीएलएल अनुज्ञप्ती
5) सर्व राज पत्रित अधिकारी
6) या कार्यालयाचे शाखा क्रमांक 5-ब
7) अभिलेख शाखा (5 प्रती)

Canteen store


महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २ रा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

Email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbu@indiatimes.com

Tel.No:- Jt. Commr: 2262038, Commr.22640802, FAX No. 22662370


प्रति,

सर्व "पीएलएल" अनुज्ञप्तीधारक
मार्फत प्रभारी अधिकारी

क्रमांक :- एफएलआर ११२००५/कॅन्टीन स्टोअर्स/लेबल/५ब    मुंबई, ३१ मार्च, २००५.

विषय : कॅन्टिन स्टोअर्स डिपार्टमेंटला पुरवठा करावयाच्या मद्याच्या लेबलाबाबत.

----------------

संरक्षण दलाना कॅन्टिन स्टोअर्समार्फत पुरविण्यात येणाऱ्या मद्यावर सवलतीच्या कमी दराने उत्पादन शुल्क आकारण्यात येते. या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे की, कॅन्टिन स्टोअर्सद्वारे संरक्षण दलाला वितरीत होणारी स्यस्त मद्ये, बाजारात अन्य नागरीकांना विक्री करण्यात येतात. सैनिकांना व अन्य नागरिकांना विक्री करावयाच्या मद्याच्या बाटलीवरील लेबलचा रंग / आकार वगैरे मध्ये काहीही फरक नसतो. संरक्षण दलास पुरवावयाच्या मद्याच्या बाटल्यांच्या लेबल्सवर "फक्त संरक्षण दलाकरिता" (FOR DEFENCE SERVICES ONLY) असे छापण्यात येते. परंतु सदर घोषवाक्य ग्राहकाच्या सहजासहजी लक्षात येत नाही. त्यामुळे सैनिकांसाठी उपलब्ध असलेले स्वस्त मद्य अन्य नागरिकांना विकण्यास सुलभ होते. साहजिकच त्यामुळे राज्य शासनाच्या महसुलावर ही अनिष्ठ परिणाम होतो. याबाबीस आळा बसावा म्हणून पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

अ) महाराष्ट्रातील संरक्षण दलासाठी कॅन्टिन स्टोअर्स डिपार्टमेंट (इं) लि. यांच्या मार्फत पुरवठा करावयाच्या विदेशी मद्याच्या बाटल्यावरील लेबल्स फक्त प्लेन पांढऱ्या रंगाची असावीत. मात्र परराज्यातील संरक्षण दलांना पुरवठा करावयाच्या मद्याची लेबल्स सध्या प्रमाणेच राहतील. प्लेन लेबल्सचा आकार सद्याच्या लेबल्सच्या आकारा ईतकाच राहील.

ब) राज्यातील संरक्षण दलासाठी पुरवठा करावयाच्या मद्यांच्या पांढ-या लेबल्सवर "फक्त संरक्षण दलासाठी" ("FOR DEFENCE SERVICES ONLY") व "फक्त महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता" ("FOR SALE IN MAHARASHTRA STATE ONLY")ही घोषवाक्ये लाल शाईत व महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अँड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर रुल्स, १९६६ चा नियम १७(२४) प्रमाणे जो अन्य मजकूर छापणे बंधनकारक आहे तो सर्व मजकूर फक्त काळया शाईने छापण्यात यावा.

**A - CSD PLAIN LABEL-3**

Scanned by CamScanner

क) "फक्त संरक्षण दलाकरिता" (FOR DEFENCE SERVICES ONLY) व "फक्त महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता" ("FOR SALE IN MAHARASHTRA STATE ONLY")या घोषवाक्याचा छपाईचा आकार १० फॉन्ट पेक्षा कमी असणार नाही.

ड) राज्यातील संरक्षणदलाना पुरवावयाच्या विदेशी मद्यावर वरील प्रमाणे प्लेन लेबलवर कोणतेही चित्र छापण्यात येणार नाही तसेच वर विहित केल्या खेरीज अन्य कोणत्याही रंगाच्या शाईचा वापर करता येणार नाही.

इ) संरक्षण दलाकरीता पुरवठा करावयाच्या मद्यावर एकापेक्षा अधिक लेबल्स लावावयाची असल्यास ती सर्व लेबल्स प्लेन पांढ-या रंगाची राहतील.

फ) महाराष्ट्रातील संरक्षण दलासाठी परराज्यातील मद्य उत्पादकांकडून होणा-या मद्याच्या पुरवठयाकरीता उपरोक्त सर्व सूचना लागू राहतील. मात्र सदर घटकाकरीता स्वतंत्ररित्या इंग्रजीतून सुचना निर्गमित करण्यात येतील.

ग) वरीलप्रमाणे सुधारित नवीन लेबलचा वापर करणे १ जून, २००५ पासून बंधन कारक राहील. जे मद्य उत्पादक राज्यातील संरक्षण दलासाठी मद्याचा पुरवठा करतात त्या मद्य उत्पादकांनी त्यांचेकडील सद्याचा शिल्लक लेबलचा साठा हे परिपत्रक प्राप्त होताच प्रभारी अधिका-यांना घोषित करावा.

म) दि.३१.५.२००५ पूर्वी जुन्या रंगीत लेबल्सचा साठा संपुष्ठात न आल्यास सदर साठा नाश करण्यात येईल.

भ) जुन्या सद्या वापरात असलेल्या लेबल्सच्या बदल्यात वापरावयाच्या पांढ-या प्लेन लेबल्सना मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित अधीक्षकांना देण्यात येत आहेत.

न) जुन्या रंगीत लेबलच्या वापरण्यास दि.३१.५.०५ नंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही याची संबंधितानी नोंद घ्यावी.

उपरोक्त सूचना महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अँड मॅन्युफॅक्चरींग पोटेबल लिकर रुल्स, १९६६ चा नियम १७(२६) व नियम २४ अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

(सी.एस.संगीतराव)
आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**A - CSD PLAIN LABEL-3**

Scanned by CamScanner

प्रत, माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व पीएलएल अनुज्ञप्तीधारक यांचे प्रभारी अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क

२) अधीक्षक व घटकाच्या प्रभारी अधिकारी यांनी परिपत्रकातील सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

सोबतचे परिपत्रक घटकास देऊन पोच प्राप्त करुन घ्यावी व पोच पावती अधीक्षकांना पाठवावी.

(सु.आ.पाटील)
सह आयुक्त (मळी व मद्यार्क)
आयुक्तांकरिता

Scanned by CamScanner